

दैनिक
सिंहवाणी वृत्त

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३१ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६

राष्ट्रवादीचे आमदार शरद पवारांना भेटणार, भेटीसाठी मागितली वेळ

राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा पुन्हा एकदा जोरात

वृत्तसंस्था, मुंबई

राज्यात एकीकडे दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा पुन्हा एकदा जोर धरत असताना, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते शरद पवारांची भेट घेत आहेत. अर्थात, प्रकृती अस्वास्थतेबाबत विचारणा करण्यासाठी ही नेतेमंडळी शरद पवारांना भेटत आहेत. मात्र, या भेटीमागे काही राजकीय घडामोडी आहे का, अशी चर्चाही राजकीय वर्तुळात घडत आहे. त्यातच, आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदारांनी शरद पवारांच्या भेटीसाठी वेळ मागितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राष्ट्रवादीच्या आमदारांनी बुधवारी शरद पवारांकडे भेटीसाठी वेळ मागिल्याची सूत्रांची माहिती आहे. नुकतेच पंकज भुजबळ आणि त्यांच्या कुटुंबियांनी देखील शरद पवारांची भेट घेतली होती. तत्पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनीही शरद पवारांची भेट घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी, १० तारखेनंतर तुम्ही पुन्हा भेटा अशी चर्चा दोन नेत्यांमध्ये झाल्याचंही समोर आलं होतं. आता, शरद पवार रुग्णालयातून घरी आले असून सध्या पुढील काही दिवस मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी आराम करणार असल्याची माहिती पवार कुटुंबीयांकडून देण्यात आली आहे.

पार्थ पवारांनीही घेतली शरद पवारांची भेट

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी गेल्याच आठवड्यात विलिनीकरणा बाबत मोठा गौप्यस्फोट केला होता. अजित पवार असते तर, तेव्हाच १२ तारखेला राष्ट्रवादीचे विलिनीकरण



होणार असल्याचे त्यांनी म्हटले होते. त्यामुळे, पुन्हा एकदा राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चा जोर धरत आहेत. दुसरीकडे शरद पवारांना ब्रीच कँडी रूग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर शनिवारी संध्याकाळी पार्थ पवारांनी शरद पवारांची भेट घेतली होती. सिल्व्हर ओक निवासस्थानी जाऊन पार्थ पवारांनी त्यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि जितेंद्र आव्हाडही उपस्थित होते. तब्बल दीड तास त्यांची चर्चा झाली. त्यानंतर, रविवारी पुन्हा पार्थ पवार सिल्व्हर ओक निवासस्थानी दाखल झाले होते, त्यामुळे राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या हालचालींना वेग आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

विलिनीकरणावर आम्ही काय बोलणार ?

दरम्यान, माजी मंत्री राजेश टोपे यांनीही आज शरद पवारांची भेट घेतली. आम्ही कौटुंबिक भेट घेतली आणि तब्येतीची त्यांची विचारपूस केली. यावेळी, मराठवाड्याच्या दुष्काळावर चर्चा झाली आणि त्यांनी आमच्याकडून माहिती देखील घेतली. दुष्काळची परिस्थिती मराठवाड्यात कशी आहे, याबाबत शरद पवारांनी विचारणा केली, असे राजेश टोपेंनी म्हटले.

आज भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही, त्यामुळे विलिनीकरणाच्या संदर्भात आम्ही काय बोलणार? आम्ही दादा असताना एकत्रित येणार होतो हे आम्ही तेव्हा सुद्धा मान्य केलं आहे. पण, त्यांनी तेव्हा देखील ही गोष्ट नाकारली होती, अशी प्रतिक्रिया राजेश टोपे यांनी दिली.

थोडक्यात

आष्टीत दोन दुचाकींची धडक, पोस्टमनसह दोघांचा मृत्यू, एक गंभीर

गडचिरोली : भरधाव वाहनांच्या वर्दळीत एका क्षणाच्या चुकीने दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला. आष्टी-चामोर्शी राष्ट्रीय महामार्गावर पेट्रोल पंपासमोर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात पोस्टमनसह दोघांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत पोस्टमनचा मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. मंगळवारी (१० नोव्हेंबर) दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली. राजू येलमुले (५३, रा. अनखोडा, ता. चामोर्शी) आणि श्याम बिस्वास (४२, रा. रवींद्रपूर, ता. चामोर्शी) अशी मृतांची नावे आहेत. संदीप येलमुले (२०) हा या अपघातात गंभीर जखमी झाला आहे.

अनखोडा येथील रहिवासी असलेले राजू येलमुले हे पोस्टमन म्हणून कार्यरत होते. मंगळवारी ते मुलगा संदीप याच्यासह दुचाकीने (एमएच ३३ झेड ६५५१) आष्टी येथील पोस्ट कार्यालयाकडे जात होते. दरम्यान, पेट्रोल पंपासमोर विरुद्ध दिशेने येणाऱ्या श्याम बिस्वास यांच्या दुचाकीशी (एमएच ३३ एबी ५८९८) त्यांच्या वाहनाची जोरदार धडक झाली. माहितीनुसार, श्याम बिस्वास यांच्या दुचाकीसमोर एक ट्रक (एमएच ३३ टी ८९०३) जात होता. पेट्रोल पंपाच्या दिशेने ट्रकचालकाने अचानक वळण घेतल्याने बिस्वास यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. त्यातून दोन्ही दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात राजू येलमुले आणि श्याम बिस्वास यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

कार अपघातात ६ मित्रांचा मृत्यू

वृत्तसंस्था, उत्तर प्रदेश

उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यात झालेल्या भीषण कार अपघातात सहा तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. दिवाळीचा सण साजरा केल्यानंतर हरिद्वारला गंगास्नानासाठी निघालेल्या सहा मित्रांच्या कारला पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव कार विजेच्या खांबाला धडकून डिव्हायडर ओलांडत दुसऱ्या बाजूला पलटी झाली. त्यानंतर कारने पेट घेतला. आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने कारमधील सहाही तरुणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन सख्ख्या भावांचाही समावेश आहे. या घटनेमुळे हरियाणातील त्यांच्या गावांमध्ये शोककळा पसरली आहे.

उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगर जिल्ह्यातील तितावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जग्गाहेडी गावाजवळ पानीपत-खटीमा राष्ट्रीय महामार्गावर हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, सहा मित्र हुंदाई ऑरा कारमधून हरियाणातील हिसार येथून हरिद्वारच्या दिशेने जात होते. कार वेगात असताना चालकाचे नियंत्रण सुटले. कार सर्वप्रथम रस्त्याच्या कडेला असलेल्या





विजेच्या खांबाला धडकली. त्यानंतर डिव्हायडर तोडून कार दुसऱ्या बाजूच्या रस्त्यावर पलटी झाली. या धडकेनंतर कारने अचानक पेट घेतला आणि काही क्षणांतच आगीने संपूर्ण कारला वेढले.

सदर अपघातात मृत्यू झालेल्या सहाही तरुणांची ओळख पटवण्यात आली आहे. हे सर्व हरियाणातील हिसार जिल्ह्यातील रहिवासी होते. मृतांमध्ये राहुल आणि अंकित हे दोन सख्खे भाऊ होते. यातील चार तरुण राखीगढी गावातील, तर दोन तरुण मोठ लुहारी गावातील रहिवासी होते. मृतांपैकी काहीजण शिक्षण घेत होते, तर काहीजण काम करत होते. या सहाही मित्रांचे वय साधारण १९ ते २३ वर्षांच्या दरम्यान असल्याचे वृत्त आहे.

गाडीला आग लागल्यानंतर बचावकार्य- अपघातानंतर कारमध्ये भीषण आग लागल्याने आत अडकलेल्या तरुणांना बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी जवळपास तासभर प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत कारमधील सहाही तरुणांचा मृत्यू झाला होता.

आग इतकी भीषण होती की मृतदेह मोठ्या प्रमाणात जळाले होते. त्यानंतर कारच्या खिडक्या तोडून आणि छताचा काही भाग हटवून मृतदेह बाहेर काढण्यात आले. सर्व मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले असून शवविच्छेदनाची प्रक्रिया करण्यात आली.

हरिद्वारमध्ये उसळला श्रद्धेचा सागर

हरिद्वार : दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी सोमवती अमावस्येचा विशेष योग जुळून आल्याने धर्मनगरी हरिद्वारमध्ये श्रद्धेचा जनसागर उसळला. सोमवारी ब्रह्ममुहूर्तापासूनच हर की पौडीसह गंगेच्या विविध घाटांवर भाविकांची मोठी गर्दी जमू लागली. सकाळी ८:३० वाजेपर्यंत सर्व प्रमुख घाटांवर मोठ्या संख्येने भाविक गंगास्नान करताना दिसत होते.तोपर्यंत सुमारे ५० हजार भाविकांनी गंगामातेत श्रद्धेची डुबकी घेतली होती. विविध राज्यांतून हरिद्वारला आलेल्या भाविकांनी गंगास्नान करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी, जीवनातील कष्टांपासून मुक्तीसाठी आणि मोक्षासाठी प्रार्थना केली. यावेळी मोठ्या संख्येने लोकांनी आपल्या पितरांच्या आत्म्याच्या शांतीसाठी तर्पण, श्राद्ध आणि पूजाअर्चाही केली. धार्मिक मान्यतेनुसार सोमवती अमावस्येला गंगास्नान, दानधर्म आणि पितरांच्या निमित्ताने केलेल्या धार्मिक कार्यांना विशेष महत्त्व आहे. यापूर्वी २०२३ मध्ये सोमवती अमावस्येला हरिद्वारमध्ये सुमारे २.५ लाख भाविकांनी गंगास्नान केले होते. यावेळीही मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता लक्षात घेता पोलिस आणि प्रशासनाने सुरक्षेची व्यापक व्यवस्था केली आहे. हर की पौडी येथील ब्रह्मकुंडात सकाळपासूनच भाविकांची वर्दळ सुरू होती. गंगास्नान केल्यानंतर लोकांनी मंदिरांमध्ये पूजा-अर्चना केली आणि गरजूंना दान दिले.



गोकुळमध्ये मोठा ट्विस्ट, राजेश पाटील वर्षभरासाठीच अध्यक्ष

कोल्हापूर : राज्याचं लक्ष लागलेल्या गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदाची अखेर निवडणूक संपन्न झाली असून माजी आमदार राजेश पाटील यांच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडली आहे. मात्र, राजेश पाटील यांचे अध्यक्षपद केवळ वर्षभरासाठी असणार असल्याचेही आजच निश्चित झाले आहे. त्यामुळे, गोकुळच्या अध्यक्ष निवडप्रक्रियेत ऐनवेळी ट्विस्ट पाहायला मिळाला. महायुतीमध्ये अध्यक्षपद पहिल्यावर्षी राष्ट्रवादीकडे ठरल्याने राजेश पाटील हे वर्षभरासाठी अध्यक्ष असतील, त्यानंतर आम्ही बैठक घेऊन पुढील निर्णय घेऊ, असे खासदार धनंजय महाडिक यांनी स्पष्ट केले. 'गोकुळ'च्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत १३ विरुद्ध १६ असा महायुतीचा विजय झाला. म्हणजेच शासननियुक्त चारही संचालकांनी महायुतीच्या पारड्यात मतं टाकल्याचं स्पष्ट झालं.

निवडणूक निर्णय अधिकारी मोसमी चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली आज (१० नोव्हेंबर) सभा पार पडली. यामध्ये गोकुळच्या अध्यक्षपदासाठी सतेज पाटलांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीकडून शशिकांत पाटील-चुयेकर, तर महायुतीप्रणित छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेश पाटील यांच्यात लढत झाली. गोकुळच्या अध्यक्षपदाच्या या लढतीत राजेश पाटील यांचा विजय झाला. गोकुळच्या निवडून आलेल्या २५ संचालकांनी आणि शासननियुक्त ४ संचालकांनी या मतदानप्रक्रियेत भाग घेतला.

हेटी शिवारात मोटारसायकल आणि ऑटोची समोरासमोर धडक, तिघे गंभीर जखमी, एक किरकोळ जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर-बैतूल राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४७ वरील हेटी शिवारात सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास मोटारसायकल आणि ऑटोमध्ये समोरासमोर भीषण धडक होऊन अपघात झाला. या अपघातात तिघेजण गंभीर जखमी झाले असून एकजण किरकोळ जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल क्रमांक टल्ल-31-BY-6697 आणि ऑटो क्रमांक MH-40-P-0941 यांच्यात ही धडक झाली. प्रथमदर्शनी मिळालेल्या माहितीनुसार, मोटारसायकल चालकहेटीकडून हेटी-सुरलाच्या दिशेने रॉंग साईडने, भरधाव वेगात व विनाहेल्मेट प्रवास करीत असताना समोरून सावनेरकडे येणाऱ्या ऑटोला



जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

या अपघातात मोटारसायकल चालक प्रकाश वामनराव कडक (वय ५०, रा. सालई) यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली. ते बेशुद्ध अवस्थेत असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे रेफर करण्यात आले.

तसेच ऑटोमधील ज्योती रमेश निखाडे (वय ४०) यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर खुशी रमेश निखाडे (वय २०, दोघीही रा. उमरी) यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. ऑटोचालक अरविंद मोतीराम आसोले (वय ४०, रा. उमरी) हे किरकोळ जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच हितज्योती आधार फाउंडेशनचे हितेश बनसोड यांच्या खासगी रुग्णवाहिकेद्वारे सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी रवाना करण्यात आले. त्यामुळे जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मदत झाली. दरम्यान, महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली.

या अपघाताबाबत महामार्ग पोलीस अढक श्रीकांत कोळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटारसायकल चालकाने रॉंग साईडने भरधाव वेगात व निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे अपघात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. पुढील तपास सावनेर पोलीस स्टेशन करीत आहे.

सावळी फाट्याजवळ इंदूर-हैदराबाद व्हॉल्वो ट्रॅव्हल्स पलटी, सहा प्रवासी जखमी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील केळवद पोलीस स्टेशन हद्दीतील NH-47 बैतूल-सावनेर महामार्गावरील जैतपूर-सावळी शिवारात आज पहाटे २.१० वाजताच्या सुमारास इंदूरहून हैदराबादकडे जाणारी इंटरसिटी कंपनीची व्हॉल्वो ट्रॅव्हल्स पलटी होऊन अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रॅव्हल्स क्रमांक MP09 BL 9090 मध्ये एकूण २९ प्रवासी प्रवास करीत होते. सावळी शिवारातील वळणावर ट्रकला ओव्हरटेक करत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रॅव्हल्स रस्त्याच्या खाली जाऊन पलटी झाली असावी.या अपघातात सहा प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. जखमींमध्ये सुनिता



केदारसिंग वर्मा (४५, इंदूर), रामसिंग सिताराम राजपूत (४४, महू), आयुष शर्मा (२४, भोपाळ), जमाल पठाण (१८, गोंडा) आणि मोहम्मद शहबाज (२२, गोंडा, उत्तर प्रदेश) यांचा समावेश असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. सहाव्या जखमीचे नाव उपलब्ध नाही.

अपघाताची माहिती मिळताच केळवद पोलीस आणि महामार्ग पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. केळवद पोलिसांच्या मदतीने सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी स्वतःच्या खाजगी अॅम्ब्युलन्समधून सर्व सहा जखमींना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, सावनेर येथे रवाना केले. तेथे प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर उर्वरित प्रवाशांना दुसऱ्या हंस ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून हैदराबादकडे रवाना करण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी वाहतूक सुरळीत केली.

या बचाव व मदतकार्यामध्ये केळवद पोलीस ठाण्याचे ठाणेदार आशिष सिंग ठाकूर, महामार्ग पोलीस API श्रीकांत कोळी, पोलीस नितेश परखड, पोलीस दिनेश काकडे तसेच हितज्योती आधार फाउंडेशनचे टीम मेंबर राजेश सिंदेवार आणि आकाश यादव यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अपघाताचे प्रथमदर्शनी कारण ट्रॅव्हल्स चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचे दिसून येत असून, पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत.

संपादकीय लेखणीतून...

वैज्ञानिक दृष्टिकोनातून
समाजातील अंधश्रद्धा हद्दपार

जागतिक विज्ञान दिन शांती आणि विकासासाठी दरवर्षी १० नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे विज्ञानाचे मानवजातीच्या शांती आणि विकासासाठी असलेले योगदान अधोरेखित करणे, तसेच विज्ञानविषयक जनजागृती निर्माण करणे होय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगात अनेक समस्या सोडवता आल्या आहेत, ज्यामध्ये पर्यावरणीय समस्या, आरोग्यविषयक समस्या, आणि ऊर्जा बचत यांचा समावेश होतो. यादिवशी शाळा, महाविद्यालये, आणि शैक्षणिक संस्था विज्ञानविषयक कार्यशाळा, प्रदर्शन, आणि चर्चासत्रांचे आयोजन करतात, ज्यातून विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्त्व समजते आणि त्यांची संशोधनविषयक आवड वाढते.

विज्ञानाचा शांतीसाठी उपयोग कसा करता येईल आणि संशोधनाचा विकासासाठी कसा फायदा होईल यावर या दिवशी विशेष भर दिला जातो. जागतिक विज्ञान दिन आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोनातून समस्या सोडवण्यास प्रेरणा देतो आणि शाश्वत विकासासाठी विज्ञानाचा वापर कसा करावा, हे शिकवतो, ज्यामुळे एक समृद्ध आणि सुरक्षित भविष्य घडू शकते. संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना - युनेस्कोने सन २००१ मध्ये या दिवसाची अधिकृत घोषणा केली. पहिली सुरुवातः हा दिवस पहिल्यांदा सन २००२ मध्ये साजरा करण्यात आला. पार्श्वभूमीः सन १९९९ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या विज्ञान परिषदेत विज्ञानाचे समाजहितासाठी असलेले योगदान अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला होता, त्यातून या दिनाची संकल्पना पुढे आली.

समाजातील सामान्य लोकांपर्यंत विज्ञानाचे महत्त्व आणि त्याची उपयोगिता पोहोचवणे. (२) शांतता व विकासः शाश्वत विकास, जागतिक शांतता आणि मानवी कल्याणासाठी विज्ञानाचा प्रभावी वापर करणे. (३) वैज्ञानिक दृष्टिकोनः समाजातील अंधश्रद्धा दूर करून वैज्ञानिक विचारसरणी आणि साक्षरतेला प्रोत्साहन देणे. (४) चर्चा व सहभागः हवामान बदल, आरोग्य आणि पर्यावरणीय समस्या यांसारख्या जागतिक आव्हानांवर वैज्ञानिक उपाय शोधण्यासाठी नागरिकांना चर्चेत सामावून घेणे. (टीपः भारतात २८ फेब्रुवारी हा दिवस सर सी. व्ही. रामन यांच्या "रामन इफेक्ट" शोधाच्या स्मरणार्थ "राष्ट्रीय विज्ञान दिन" म्हणून साजरा केला जातो, जो जागतिक विज्ञान दिनापेक्षा खूप वेगळा आहे. दर १० नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा, जागतिक शांतता आणि विकासासाठी विज्ञान दिन समाजात विज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका आणि उदयोन्मुख वैज्ञानिक समस्यांवरील वादविवाद सोडवतो.

सामान्य जनमानसात विज्ञानाबद्दल जागृती वाढावी, विज्ञानाचा शांततेसाठी आणि विकासासाठी वापर व्हावा यासाठी हा दिवस साजरा केला जातो. विज्ञानाचा शांतता आणि विकासाबद्दलचा जनमानसातील दृष्टिकोन अधिक प्रगल्भ करण्याच्या उद्देशाने जगभरात १० नोव्हेंबरला शांतता आणि विकासासाठी जागतिक विज्ञान दिन साजरा केला जातो. अंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या उत्साहात उपक्रम राबवले जातात. सन २००१ मध्ये UNESCO ने हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर सन २००२ मध्ये प्रथमच तो साजरा करण्यात आला. यावर्षीचा हा २४ वा जागतिक विज्ञान दिन असून त्याची शाश्वत विकासासाठी मूलभूत विज्ञान ही या वर्षीची थिम आहे. ही थीम ८ जुलै २०२६ पासून सुरू झाली आहे. सामान्य जनमानसात विज्ञानाबद्दल जागृती वाढावी, विज्ञानाचा शांततेसाठी आणि विकासासाठी वापर व्हावा यासाठी हा दिवस साजरा केला जातो. याबरूरच विविध दिशेमध्ये वैज्ञानिक संशोधानांची देवाणघेवाण करणे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विज्ञान समित्यांची अथवा व्यासपीठांची स्थापना करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे. तसेच जगभरातून येणाऱ्या समस्यांकडे वैज्ञानिक जगताचे लक्ष वेधणे, असेही हा दिवस साजरा करण्यामागे उद्देश आहेत.

युनेस्को आणि इंटरनॅशनल कौन्सिल फॉर सायन्स यांनी सन १९९९ मध्ये जागतिक विज्ञान परिषद भरवली होती. हा कार्यक्रम बुडापेस्ट येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी विज्ञानाचा आणि शास्त्रज्ञांच्या ज्ञानाचा वापर, उद्दिष्टांची पूर्तता आणि त्यांची वचनबद्धता निश्चित केली जावची. याच कार्यक्रमात, इथिओपिया आणि मलावी येथील शिष्टमंडळांनी ब्रिटीश असोसिएशन फॉर द अॅडव्हान्समेंट ऑफ सायन्सच्या सहकार्याने जागतिक विज्ञान दिन सर्वांसमोर ठेवला. यानंतर सर्वांचे एकमत झाल्यावर ऑक्टोबर २००० मध्ये सर्वसाधारण परिषदेच्या १६२ व्या सत्रात या दिवसाला मान्यता देण्यात आली.

बँकिंग संकट ते सत्तांतर : पराग्वेने दिलेला जगाला गंभीर इशारा

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

दक्षिण अमेरिका खंडातील पराग्वे या देशात अलीकडेच एक अभूतपूर्व आर्थिक आणि राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला आहे. एका मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या बँकेच्या अचानक बुडण्यामुळे केवळ सामान्य जनतेचे कोट्यवधी रुपयेच अडकले नाहीत, तर या प्रकरणाच्या थेट परिणामामुळे देशाच्या सर्वोच्च नेत्याला आपली खुर्चीही गमवावी लागली आहे. भ्रष्टाचार, पैशांचा गैरवापर आणि राजकीय दबावामुळे देशाची संपूर्ण अर्थव्यवस्था कशी डळमळीत होऊ शकते, याचे हे एक अत्यंत गंभीर आणि जिवंत उदाहरण संपूर्ण जगासमोर उभे राहिले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात देशातील ५ व्या क्रमांकाची सर्वात मोठी आणि लोकप्रिय असणाऱ्या यूएनो बँकेच्या अचानक कोसळण्याने झाली. ही बँक प्रामुख्याने डिजिटल बँक म्हणून वेगाने उदयास आली होती. नोव्हेंबर २०२६ च्या पहिल्या आठवड्यात जेव्हा ही बँक अचानक दिवाळखोरीत निघाली, तेव्हा देशात एकच हाहाकार उडाला. या एका झटक्यामुळे पराग्वेच्या सुमारे ३० लाख ग्राहकांचे बँक खाते आणि कार्ड निष्क्रिय झाले. देशाच्या जवळपास निम्म्या लोकसंख्येचे पैसे या बँकेत अडकले होते. लोकांना आपलेच कष्टाचे पैसे काढता येत नव्हते किंवा कोणताही डिजिटल व्यवहार करता येत नव्हता. त्यामुळे संतप्त झालेली जनता रस्त्यावर उतरली आणि राजधानी असुनसिओन शहरात संसदेच्या बाहेर ऐतिहासिक जनक्षोभ उसळला.

या भीषण आर्थिक संकटाची पाळेमुळे थेट सरकारच्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचलेली होती. या बँकेच्या पतनामागचे मुख्य कारण म्हणजे सत्ताधाऱ्यांचा भ्रष्ट हस्तक्षेप. तत्कालीन राष्ट्रपती सँटियागो पेना यांच्यावर असे गंभीर आरोप ठेवण्यात आले की, त्यांनी आपल्या पदाचा आणि अधिकारांचा गैरवापर करून जनतेचा पैसा तसेच राज्याचा पेन्शन निधी याच यूएनो बँकेत जमा करण्यासाठी मोठा राजकीय दबाव आणला होता. दुसरीकडे, बँकेचे व्यवस्थापन बेकायदेशीररित्या स्वतःच्याच जवळच्या व्यक्तींना आणि कंपन्यांना भरमसाट कर्ज वाटत होते. मध्यवर्ती बँक आणि नियामक संस्थांनी या सर्व भयंकर गैरप्रकारांकडे जाणूनबुजून डोळेझाक केली, कारण त्यांच्यावर थेट राष्ट्रपतींचा दबाव होता.

बँकेचे बिंग फुटल्यानंतर आणि लोकांचा रोष अनावर झाल्यानंतर, देशाच्या राजकारणात मोठे वादळ निर्माण झाले. जनतेच्या असंतोषाची दखल घेत संसदेच्या वरिष्ठ सभागृहाने म्हणजेच सिनेटने तातडीने पावले उचलत तत्कालीन राष्ट्रपती सँटियागो पेना यांच्यावर महाभियोग चालवला. अतिशय वेगाने घडलेल्या या राजकीय घडामोडींमध्ये संसदेने सर्वसंमतीने त्यांना पदावरून बडतर्फ केले. एवढेच नव्हे, तर पदावरून हटवल्यानंतर लगेचच त्यांना त्यांच्याच घरात नजरकैदेत ठेवण्यात आले आणि त्यांच्याविरोधात आर्थिक गैरव्यवहारांची सखोल चौकशी सुरू करण्यात आली. अवघ्या काही दिवसांत घडलेल्या या अभूतपूर्व सत्तांतराला अनेक जण एक प्रकारचा उठाव किंवा राजकीय क्रांती म्हणून पाहत आहेत.

राष्ट्रपतींना पदच्युत केल्यानंतर देशाची सूत्रे तत्कालीन उपराष्ट्रपती पेड्रो अलियाना यांच्या हाती सोपवण्यात आली. ५२ वर्षीय पेड्रो अलियाना यांनी देशाचे ५३ वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली असून, त्यांचा हा कार्यकाळ वर्ष २०२८ पर्यंत असणार आहे. सध्या या संपूर्ण बँक घोटाळ्याची अतिशय कसून चौकशी सुरू आहे. बँकेचे संस्थापक मिगुएल वाझक्वेज यांच्यासह एकूण २७ जणांवर फसवणूक आणि विश्वासाला तडा दिल्याचा ठपका ठेवत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तसेच बँकेच्या अनेक माजी संचालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. आता नवीन राष्ट्रपतींसमोर सर्वात मोठे आणि खडतर आव्हान आहे ते म्हणजे, बँकिंग व्यवस्थेवरील जनतेचा उडालेला विश्वास पुन्हा संपादन करणे आणि सुमारे ३० लाख सामान्य नागरिकांचे अडकलेले पैसे त्यांना सुरक्षितपणे परत मिळवून देऊन देशाला या संकटातून बाहेर काढणे.

पराग्वेमधील बँकिंग संकट आणि त्यातून उद्भवलेली राजकीय उलथापालथ ही केवळ एका देशाची अंतर्गत घटना म्हणून पाहता येणार नाही. ही घटना भारतासह जगातील सर्व लोकशाही आणि विकसनशील राष्ट्रांसाठी एक गंभीर इशारा आहे. बँकिंग व्यवस्था ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि नागरिकांच्या विश्वासाचा कणा असते. या व्यवस्थेत राजकीय हस्तक्षेप, भ्रष्टाचार, पक्षपात आणि नियामक संस्थांची निष्क्रियता शिरली, तर त्याचे परिणाम केवळ आर्थिक नुकसानापुरते मर्यादित राहत नाहीत; ते संपूर्ण राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेलाही हादरवू शकतात.

भारताच्या संदर्भात या घटनेतून विशेष धडा घेण्याची आवश्यकता आहे. देशातील बँका, वित्तीय संस्था, सहकारी बँका आणि डिजिटल वित्तीय व्यवस्था या केवळ आर्थिक संस्थाच नसून कोट्यवधी नागरिकांच्या आयुष्यभराच्या कष्टाची आणि बचतीची संरक्षक आहेत. त्यामुळे या संस्थांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि सक्षम नियमन अत्यावश्यक आहे. कोणत्याही राजकीय किंवा प्रभावशाली व्यक्तीच्या दबावाखाली बँकिंग निर्णय घेतले जाऊ नयेत आणि नियामक संस्थांनी पूर्ण स्वायत्तता व निष्पक्षतेने कार्य केले पाहिजे. विशेषतः भारतात डिजिटल बँकिंग, ऑनलाइन व्यवहार आणि तंत्रज्ञानाधारित आर्थिक सेवा वेगाने विस्तारत असताना सायबर सुरक्षा, ग्राहकांच्या ठेवींचे संरक्षण आणि वित्तीय संस्थांवरील प्रभावी देखरेख यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. सामान्य नागरिकांचा बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास हा देशाच्या आर्थिक स्थैर्याचा अत्यंत महत्त्वाचा आधार आहे. हा विश्वास एकदा डळमळीत झाला, तर त्याचे दूरगामी परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होऊ शकतात.

पराग्वेची घटना अखेरीस एक मूलभूत सत्य अधोरेखित करते– लोकशाहीत सत्ता कितीही शक्तिशाली असली, तरी ती जनतेच्या विश्वासापेक्षा मोठी असू शकत नाही. आर्थिक संस्थांचा गैरवापर, जनतेच्या पैशांशी खेळ आणि सत्तेचा हस्तक्षेप यावर वेळीच नियंत्रण ठेवणे हीच मजबूत लोकशाहीची खरी ओळख आहे. भारतानेही या घटनांकडे केवळ परदेशातील राजकीय नाट्य म्हणून न पाहता, सुदृढ, पारदर्शक, स्वायत्त आणि जनहिताभिमुख आर्थिक व्यवस्थेच्या उभारणीसाठी एक महत्त्वपूर्ण धडा म्हणून पाहण्याची गरज आहे.

- ९५६१५९४३०६

भाऊबीज: भावाबहिनींच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक

कृष्णकुमार निकोडे गडचिरोली



भाऊबीज हा भाऊ आणि बहिणीच्या पवित्र प्रेमाचे प्रतीक असलेला दिवाळी सण आहे. हा सण कार्तिक शुद्ध द्वितीयेला-दिवाळीचा सहावा दिवस साजरा केला जातो. या सणाला "यमद्वितीया" असेही म्हणतात. भाऊबीजेची पौराणिक कथाः यम आणि यमुना- पौराणिक कथेनुसार, या दिवशी भगवान यमराज आपली बहीण यमुना हिच्या आमंत्रणावरून तिच्या घरी जेवायला गेले होते. यमुनेने आपल्या भावाचा आदरतिथ्य सत्कार करून त्याला ओवाळले. यामुळे प्रसन्न होऊन यमराजाने तिला वर मागण्यास सांगितले. तेव्हा यमुनेने मागितले की, "आजच्या दिवशी जो भाऊ आपल्या बहिणीच्या घरी भोजन करेल आणि बहीण भावाला ओवाळेल, त्याला यमभय असू नये". तेव्हापासून ही परंपरा शुरू झाली.

साजरी करण्याची पद्धतः गोडधोड भोजनः विवाहित बहिणी आपल्या भावाला आदराने आपल्या घरी किंवा भाऊ बहिणीच्या घरी जातो, आणि गोडधोड जेवण करतात. औक्षणः बहीण भावाच्या कपाळावर कुंकू-अक्षता लावून निरंजन किंवा दिव्याने ओवाळते. दीर्घायुष्याची प्रार्थनाः बहीण भावाच्या दीर्घायुष्य आणि आरोग्यासाठी देवाला प्रार्थना करते. ओवाळणी- भेटवस्तूः औक्षण झाल्यानंतर भाऊ आपल्या बहिणीला प्रेमळ भेटवस्तू, वस्त्रे किंवा ओवाळणी देतो. विशेष टीपः जर एखाद्या बहिणीला भाऊ नसेल, तर ती चंद्रकोरीची पूजा करून चांदोबाला ओवाळते.

भाऊबीज हा हिंदुधर्मीय भाऊ-बहीण साजरा करीत असलेला एक सण आहे. हा सण कार्तिक शुद्ध द्वितीया- यमद्वितीया या दिवशी असतो. हा महाराष्ट्रीय पद्धतीच्या दिवाळीतला सहावा दिवस असतो. या सणास हिंदीत भाईदूज म्हणतात. या दिवशी बहिणीच्या किंवा स्वतःच्या घरी भाऊ गोडधोड भोजन करतो आणि सायंकाळी चंद्राची कोर दिसल्यानंतर बहीण प्रथम चंद्रकोरीस व नंतर भावाला ओवाळते. भाऊ मग ओवाळणीचे ताटात "ओवाळणी" देऊन बहिणीचा सत्कार करतो. कायस्थ समाजाचे लोक या दिवशी चित्रगुप्ताच्या देवळात जाऊन दौत-टाकेची आणि चित्रगुप्ताची पूजा करतात. या दिवशी यमराजाने आपली बहीण यमुनेच्या घरी जाऊन तिला वस्त्रे अलंकार इत्यादी वस्तू देऊन तिच्या घरी भोजन केले म्हणून या दिवसाला यमद्वितीया म्हणतात.

या दिवशी यमुना नदीत स्नान करणे अत्यंत पवित्र मानतात म्हणजे असे केल्यामुळे त्यावर्षी यमपासून तरी भय नसते असा समज आहे. यम आणि यमी या भावा-बहिणीच्या प्रेमाबद्दल अशी कथा आहे की यम मृत्यू पावला त्यावेळी यमीला एवढे दुःख झाले की ती आपली रडणे व डोळ्यांतील अश्रू काही केल्या थांबवेना. तेव्हा शेवटी दिवस संपला हे दाखवण्यासाठी देवाने रात्र निर्माण केली आणि मग यमीचे भावा बद्दलचे दुःख थोडेसे हलके झाले तेव्हापासून भाऊबीजेची प्रथा पडली. आपल्या भावाचे आयुष्य वाढावे, म्हणून बहिणीने यमराजाची पूजा आणि प्रार्थना करवयाची.

या दिवशी बहीण भावाला आरती ओवाळून त्याची पूजा करीत असते त्याला प्रेमाचा टिळा लावते तो टिळा बहिणीच्या निस्वार्थी प्रेमभावना व्यक्त करीत असतो भावाची पूजा म्हणजे यमराजाच्या पाशातून म्हणजे मृत्यूपासून भावाची सुटका व्हावी व तो चिरंजीव राहावा हा यामागचा उद्देश असतो. भाऊ आपल्या यथाशक्तीप्रमाणे पैसे कापड दागिना असे वस्तू ओवाळणी टाकतो. या दिवशी घरी जेवण करू नये व पक्वान्ना हातचे जेवण करू नये असे धर्मग्रंथात सांगितले आहे. जवळचा किंवा दूरचा भाऊ नसल्यास चांदोबास ओवाळण्याची पद्धत आहे आपल्या सणामागे असलेल्या कल्पनांची महानता- विशालता यावरून दिसून येते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी! भाऊबीजेच्या समस्त भावाबहिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी.

- ९४२३७१४८८३

न्यूझीलंड दौऱ्यात कसोटीची रंगीत तालीम! गंभीर वनडे संघासोबत, गोलंदाजीचे पर्याय कसोटीसाठी सज्ज

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

अर्शदीप, गुरनूर आणि आकिब नबी यांना कसोटी मालिकेच्या तयारीसाठी न्यूझीलंडमध्येच ठेवण्याचा निर्णय; ११ नोव्हेंबरपासून भारतीय संघाचे सराव शिबिर

न्यूझीलंडविरुद्ध सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेनंतर भारतीय संघाचे लक्ष कसोटी क्रिकेटकडे वळणार आहे. आगामी कसोटी मालिकेचे महत्त्व लक्षात घेऊन भारतीय संघ व्यवस्थापनाने तयारीचे नियोजन आतापासूनच सुरू केले आहे. विशेष म्हणजे, एकदिवसीय मालिकेतील तिसऱ्या सामन्यानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर वगळता फलंदाजी आणि गोलंदाजी प्रशिक्षक कसोटी संघाच्या तयारीसाठी दाखल होणार आहेत. वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग, गुरनूर बरार आणि आकिब नबी यांनाही एकदिवसीय मालिकेनंतर न्यूझीलंडमध्येच थांबविण्यात आले आहे. फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी शनिवारी या वृत्ताला दुजोरा दिल्याने भारतीय संघाच्या आगामी रणनीतीचे संकेत मिळाले आहेत.

एकदिवसीय मालिकेतील तिसरा आणि अखेरचा सामना मंगळवारी हॅमिल्टन येथे होणार आहे. त्यानंतर भारतीय संघाच्या तयारीचे केंद्रबिंदू कसोटी क्रिकेट असेल. गौतम गंभीर एकदिवसीय संघासोबत आपली जबाबदारी पार पाडतील, तर फलंदाजी प्रशिक्षक सितांशु कोटक आणि गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्न मॉर्केल कसोटी संघाच्या तयारीत सहभागी होतील. गंभीर आणि मॉर्केल वेलिंग्टनला प्रवास करणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.

१६ पैकी १३ कसोटीपटू न्यूझीलंडमध्ये दाखल

कसोटी मालिकेसाठी निवडण्यात आलेल्या १६ सदस्यीय भारतीय संघातील १३ खेळाडू आधीच न्यूझीलंडमध्ये दाखल झाले आहेत. यामध्ये इंडिया 'अ' संघातील सहा आणि एकदिवसीय संघातील सात खेळाडूंचा समावेश आहे. त्यामुळे कसोटी मालिकेच्या तयारीसाठी भारतीय संघाला पुरेसा वेळ मिळणार आहे.

इंडिया 'अ' संघातून यशस्वी जैस्वाल, ध्रुव जुरेल, साई सुदर्शन, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह आणि प्रसिद्ध कृष्णा हे खेळाडू न्यूझीलंडमध्ये आहेत. दुसरीकडे, एकदिवसीय संघातील शुभमन गिल, के. एल. राहुल, आकाश दीप, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज आणि अंशुल कंबोज हे सात खेळाडूही कसोटी संघाच्या नियोजनाचा भाग असतील.

उर्वरित ऋषभ पंत, रवींद्र जडेजा आणि देवदत्त पडिक्कल हे तीन खेळाडू ११ नोव्हेंबरपर्यंत संघात दाखल होतील. म्हणजेच कसोटी संघातील बहुतांश खेळाडू नियोजित वेळेते एकत्र येणार असून सरावाला सुरुवात करण्यासाठी आवश्यक वातावरण तयार झाले आहे. या दौऱ्यातील आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे अर्शदीप सिंग, गुरनूर बरार आणि आकिब नबी यांना एकदिवसीय मालिकेनंतरही न्यूझीलंडमध्येच ठेवणे. या तिन्ही वेगवान गोलंदाजांच्या कामगिरीकडे पाहता हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरतो. न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत अर्शदीप सिंगने सहा बळी मिळवून भारतीय गोलंदाजांमध्ये आघाडी घेतली. त्यानंतर सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेत गुरनूर बरारने पहिल्या दोन सामन्यांत तब्बल सात बळी मिळवत आपली छाप पाडली आहे. अर्शदीपने चार, तर आकिब नबीने दोन बळी मिळवले आहेत. विशेष म्हणजे, गुरनूरचा एकदिवसीय सामन्यांतील इकॉनॉमी रेट ३.८२ इतका प्रभावी आहे. अर्शदीपचा ५.०५, तर आकिब नबीचा ४.९२ असा इकॉनॉमी रेट आहे. बळी मिळवण्याची क्षमता आणि धावा रोखण्याचे कौशल्य या दोन्ही बाबतींत गुरनूरने आपली उपयुक्तता सिद्ध केली आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये वेगवान गोलंदाजांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. न्यूझीलंडमधील वातावरण, खेळपट्ट्यांचे स्वरूप आणि चेंडूला मिळणारी स्विंग यांचा विचार करता भारतीय गोलंदाजांना स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या तिन्ही गोलंदाजांना कसोटी मालिकेपूर्वी अधिक वेळ देण्याचा निर्णय भारतीय संघासाठी फायदेशीर ठरू शकतो.

अर्शदीपकडे डावखुरी वेगवान गोलंदाजी आणि चेंडू स्विंग करण्याचे कौशल्य आहे. गुरनूरने मर्यादित संधींत सातत्यपूर्ण बळी मिळवण्याची क्षमता दाखवली आहे, तर आकिब नबीकडूनही वेगवान गोलंदाजीच्या फळीत पर्याय निर्माण होण्याची अपेक्षा आहे. मात्र, मर्यादित षटकांतील कामगिरीचे कसोटी क्रिकेटमध्ये रूपांतर करणे हे त्यांच्यासमोरील खरे आव्हान असेल.

११ नोव्हेंबरपासून कसोटी शिबिर

भारतीय कसोटी संघाचे तयारी शिबिर ११ नोव्हेंबरपासून सुरू होणार असून त्यामध्ये पाच ते सहा सराव सत्रे होण्याची अपेक्षा आहे. सितांशु कोटक यांच्या माहितीनुसार, इंडिया 'अ' संघाच्या तीन सामन्यांमुळे भारतीय फलंदाज आणि गोलंदाजांना सामन्यांचा सराव मिळाला आहे. त्यामुळे कसोटी मालिकेपूर्वी खेळाडूंची तयारी अधिक भक्कम होण्यास मदत होईल. विशेषतः यशस्वी जैस्वाल, ध्रुव जुरेल, साई सुदर्शन, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह आणि प्रसिद्ध कृष्णा यांना इंडिया 'अ' संघाच्या माध्यमातून न्यूझीलंडमधील परिस्थितीचा अनुभव घेण्याची संधी मिळाली आहे. हा अनुभव मुख्य कसोटी मालिकेत निश्चितच उपयोगी ठरू शकतो.

भारतीय संघ व्यवस्थापनाची दूरदृष्टी

भारतीय संघ व्यवस्थापनाने यावेळी केवळ सामन्यांच्या निकालांवर लक्ष केंद्रित न करता आगामी कसोटी मालिकेच्या तयारीला प्राधान्य दिल्याचे दिसते. एका बाजूला एकदिवसीय मालिकेतील आव्हान कायम ठेवतानाच दुसऱ्या बाजूला कसोटी संघाची बांधणी आणि सराव यांचे स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. न्यूझीलंडमध्ये कसोटी क्रिकेट खेळताना फलंदाजांची तांत्रिक तयारी, वेगवान गोलंदाजांची अचूक टप्पावर गोलंदाजी आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता निर्णायक ठरणार आहे. विशेषतः बुमराह, सिराज, आकाश दीप, प्रसिद्ध कृष्णा आणि अर्शदीप यांच्यासारख्या गोलंदाजांच्या उपलब्धतेमुळे भारताच्या वेगवान गोलंदाजीला चांगली खोली मिळू शकते. गुरनूर आणि आकिब यांच्यासारख्या पर्यायी गोलंदाजांनाही स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळू शकते.

एकूणच, न्यूझीलंडविरुद्धची एकदिवसीय मालिका संपण्यापूर्वीच भारतीय संघाने कसोटी मालिकेची तयारी सुरू केली आहे. ११ नोव्हेंबरपासून सुरू होणारे सराव शिबिर, इंडिया 'अ' संघाच्या सामन्यांतून मिळालेला अनुभव आणि महत्त्वाच्या वेगवान गोलंदाजांना न्यूझीलंडमध्येच थांबविण्याचा निर्णय या सर्व बाबी भारताच्या नियोजनबद्ध तयारीचे दर्शन घडवतात. एकदिवसीय मालिकेतील निकाल काहीही असो, कसोटी मालिकेत न्यूझीलंडला त्यांच्याच भूमीत आव्हान देण्यासाठी भारतीय संघ आतापासूनच सज्ज होत असल्याचे या हालचालींवरून स्पष्ट होते.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत अनोखा उपक्रम

गोपाळ समाजासोबत साजरी केली दिवाळी, चंद्रशेखर बावनकुळेंनी सासेगाव आणि खेतापूर येथे गोपाळ समाज बांधवांसोबत केली दिवाळी साजरी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर (कुही)

राज्यातील काही भागांत निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अनावश्यक खर्च टाळून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देत महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्यांचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपला नातू अधिराज आष्टनकर याचा वाढदिवस गोपाळ समाजबांधवांसोबत साजरा केला. कुही तालुक्यातील सासेगाव आणि खेतापूर येथे त्यांनी गोपाळ समाजातील कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद वाटून घेतला.



नातवाच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमात गोपाळ समाजबांधवांना दिवाळीचा फराळ वितरित करण्यात आला. यावेळी बावनकुळे यांनी समाजातील महिला, पुरुष आणि कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. विशेषतः निवासाचा प्रश्न, पिण्याचे पाणी, वीज तसेच अन्य मूलभूत सुविधांबाबत त्यांनी माहिती घेतली. गोपाळ समाजातील बांधवांना सन्मानाने आणि सुरक्षितपणे जीवन जगता यावे, यासाठी त्यांना पक्की घरे उपलब्ध करून देण्यासह आवश्यक मूलभूत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी, अशा सूचना बावनकुळे यांनी यावेळी दिल्या.

सण-उत्सव आणि कौटुंबिक आनंदाचे क्षण हे केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि वंचित घटकांसोबत साजरे केले पाहिजेत, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत समाजातील प्रत्येक घटकाच्या अडचणींची जाणीव ठेवून साधेपणाने आनंद साजरा करण्याचा बावनकुळे यांचा हा प्रयत्न लक्षवेधी ठरला.

नातवाच्या वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची जोड

वाढदिवसाच्या निमित्ताने गोपाळ समाजबांधवांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या समस्या जाणून घेण्याला बावनकुळे यांनी प्राधान्य दिले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या सुविधा पोहोचाव्यात आणि प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित निवारा मिळावा, हीच या भेटीमागील भूमिका होती.

बँकांच्या खासगीकरणावर आणि जनतेच्या पैशांच्या सुरक्षेवर होणार मंथन, नागपुरात कामगार केसरी रुईकर स्मृती व्याख्यानाचे आयोजन १४ नोव्हेंबरला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : बँकांचे खासगीकरण आणि जनतेच्या पैशांची सुरक्षा या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर नागपूर येथे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. कामगार केसरी रुईकर स्मृती व्याख्यानमाला २०२६ अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, बँकिंग क्षेत्रातील बदल, खासगीकरणाचे परिणाम आणि सामान्य जनतेच्या ठेवींच्या सुरक्षेबाबत यावेळी सखोल चर्चा होणार आहे. या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते देविदास तुळजापूरकर (चेअरमन, बँकिंग एज्युकेशन ट्रेनिंग रिसर्च अकादमी आणि पर्यायं फाउंडेशन) हे असणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रीनिवास खांदवाले राहणार आहेत. अर्पण सभागृह, हिंदी मोर भवन, झाशी राणी चौक, नागपूर ५.३० वाजता कार्यक्रम सुरु होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून महत्त्वपूर्ण विषयावरील चर्चा ऐकण्यासाठी नागरिक, कामगार, सामाजिक कार्यकर्ते, बँक कर्मचारी आणि पत्रकार बांधवांनी आपल्या मित्रपरिवारासह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला रमेश पाटणे, गुरुप्रीत सिंह, विलास भोंगाडे, डॉ. गौतम कांबळे, अनिल ठोकमांडे, निलेश नासरे, अशोक दांडे, नरेश अडचुळे, राम रुईकर, डॉ. मनिषा रुईकर, डॉ. एम. एल. कासारे आणि डॉ. प्रदीप मुक्तिबोध अथक परिश्रम घेत आहे. जनतेच्या कष्टाच्या पैशांची सुरक्षा आणि बँकिंग व्यवस्थेचे भविष्य यावर प्रकाश टाकणारे हे व्याख्यान नागपूरकरांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

एनसीएमसी कार्ड महिलांसाठी डोकेदुखी, कार्ड टॅप न झाल्यास पूर्ण भाडे

मौदा बस स्थानकावर ॲक्टिव्हेट करण्यासाठी २० रुपये बेकायदेशीर शुल्क

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

शासनाच्या डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत प्रवाशांच्या सुविधेसाठी सुरू करण्यात आलेले नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड सध्या महिला प्रवाशांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. तांत्रिक अडचणी आणि नियोजनाच्या अभावामुळे महिलांना या सुविधेचा लाभ मिळण्याऐवजी मनस्ताप सहन करावा लागत असल्याचा प्रकार समोर आला आहे.



तांत्रिक बिघाडामुळे सवलतीला हरताळ

राज्य शासनाने महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिली आहे. अनेक महिलांनी प्रवासातील सुटसुटीतपणासाठी एनसीएमसी कार्ड काढले आहे. मात्र, बसमधील वाहकांकडील (कंडक्टर) ईटीआयएम मशीनमध्ये हे कार्ड अनेकदा 'टॅप' होत नाही. तांत्रिक त्रुटीमुळे कार्ड स्कॅन न झाल्यास, वाहक महिला प्रवाशांचे ऐकून न घेता त्यांच्याकडून थेट पूर्ण तिकिटाचे पैसे वसूल करत आहेत. यामुळे शासनाची ५० टक्के सवलत असूनही महिलांना पूर्ण भाडे मोजावे लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे. दुसरीकडे, मौदा बस स्थानकावर हे कार्ड ॲक्टिव्हेट (सुरू) करण्यासाठी महिलांकडून प्रति कार्ड २० रुपये शुल्क आकारले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नियमानुसार एनसीएमसी कार्डचे ॲक्टिव्हेशन मोफत असणे अपेक्षित असताना, स्थानिक पातळीवर प्रवाशांची अशी आर्थिक लूट केली जात असल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या डिजिटल सुविधेचा बोजवारा उडाल्यामुळे महिला प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "तांत्रिक चुकीची शिक्षा प्रवाशांना का?" असा सवाल महिला करत आहेत. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची त्वरित दखल घेऊन वाहकांना योग्य सूचना द्याव्यात, मौदा बस स्थानकावरील अवैध वसुली थांबवावी आणि मशीनमधील तांत्रिक बिघाड त्वरित दुरुस्त करावा, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

जवाहर विद्यार्थी गृहात तेली समाजाचा भव्य वधू-वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न

३५० वधू-वरांचा सहभाग, 'सुयोग' पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन, वैवाहिक जीवन व कायदेशीर बाबींवर मार्गदर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जवाहर विद्यार्थी गृह, नागपूर यांच्या वतीने सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे ९ नोव्हेंबर रोजी तेली समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींसाठी भव्य वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला तेली समाजातील वधू-वर तसेच समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मेळाव्यात सुमारे ३५० वधू-वरांनी सहभाग नोंदवून आपल्या भावी जीवनसाथीच्या निवडीसाठी परिचय करून दिला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आनंदराव गिरडकर आणि डॉ. आरती वंजारी उपस्थित होते. जवाहर विद्यार्थी गृहाचे अध्यक्ष नरेंद्र दिवटे यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते सुयोग या वधू-वर परिचय पुस्तिकेचे उद्घाटन करण्यात आले. या पुस्तिकेमुळे विवाहेच्छुक युवक- युवती आणि त्यांच्या पालकांना योग्य स्थळांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

यावेळी डॉ. आरती वंजारी यांनी वधू-वरांना वैवाहिक संबंध, परस्पर समजूत दारपणा, विश्वास, संवाद आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. यशस्वी वैवाहिक जीवनासाठी एकमेकांच्या भावना, विचार आणि अपेक्षांचा आदर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे आनंदराव गिरडकर यांनी वैवाहिक जीवनातील विविध कायदेशीर बाबी, विवाहा संदर्भातील कायदेशीर तरतुदी तसेच पती-पत्नीचे अधिकार व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विवाहपूर्व आवश्यक माहिती आणि कायदेशीर जाणीव असणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून धर्मराज रेवतकर, गुलाब जुनानकर, मिलिंद माकडे, डॉ. ढोबळे, जगदीश गायधने, अरुण वैद्य, शाम वैद्य आणि नानाभाऊ टापरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जवाहर विद्यार्थी गृहाचे मुख्य कार्यवाह हर्षवर्धन बेले, कोषाध्यक्ष बालानंद टापरे यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे संयोजन हरीश जयपूरकर यांनी केले. तसेच कार्यकारिणी सदस्य हरीश दांडेकर, श्रीमती बडवाईक, प्रवीण अंबागडे, लोकनाथ भुरे, रमेश पिसे, प्रकाश तिळगुळे, विजय मोडघरे, रवी उराडे, देवेंद्र वाडीभस्मे आणि प्रफुल्ल रेवतकर यांनी परिश्रम घेतले.

वधू-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील विवाहेच्छुक युवक- युवतींना एकाच व्यासपीठावर येण्याची संधी उपलब्ध झाली. समाजातील विवाह इच्छुक कुटुंबांना योग्य स्थळांची माहिती मिळावी, परस्पर परिचय वाढावा आणि विवाह जुळविण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली. समाज बांधवांच्या मोठ्या सहभागामुळे आणि सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्यामुळे हा वधू- वर परिचय मेळावा उत्साहपूर्ण यशस्वीरीत्या संपन्न झाला.

१५ नोव्हेंबरला श्रींची नागपूर-कोराडी भव्य पायदळ दिंडी यात्रा, भक्तिमय प्रवासात सहभागी होण्याचे भाविकांना आवाहन

शेगांवची भक्तिगंगा कोराडीच्या महालक्ष्मी मंदिरात अवतरणार!, श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, निर्मल नगरी, नागपूरचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री संत गजानन महाराजांच्या भक्तांसाठी श्रद्धा, भक्ती आणि चैतन्याचा अनोखा सोहळा ठरणारी श्रींची नागपूर - कोराडी पायदळ दिंडी यात्रा रविवार, १५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, निर्मल नगरी, नागपूर यांच्या वतीने आयोजित या यात्रेच्या माध्यमातून शेगावची भक्तिगंगा कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात अवतरणार आहे. या दिंडी यात्रेत मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री संत गजानन महाराजांच्या भक्तीचा जागर करत निघणारी ही पायदळ दिंडी नागपूर आणि कोराडी परिसरातील भाविकांसाठी विशेष धार्मिक महत्त्वाची ठरणार आहे. श्रींच्या नामस्मरणात, भजन- कीर्तनात आणि भक्तिमय वातावरणात सुमारे २० किलो मीटरचे अंतर पार करून दिंडी कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात पोहोचणार आहे. या यात्रेमुळे भाविकांना एकत्र येऊन सामूहिक भक्तीचा आनंद अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

सकाळी प्रस्थान, दुपारी कोराडीत आगमन

रविवार, १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता. दिंडीचे प्रस्थान होणार आहे. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता दिंडीचे कोराडी येथे आगमन होईल. दुपारी १ वाजता महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १.३० ते २ या वेळेत प्रवचन व कीर्तनाचा कार्यक्रम होणार असून, दुपारी २ वाजल्यापासून भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

असा असेल दिंडीचा मार्ग

निर्मल नगरी येथून सुरू होणारी ही दिंडी संस्कारधाम चौक, गणेशपेठ बस स्टँड, कॉटन मार्केट, गणेश टेकडी, आरटीओ कार्यालय, सदर, ताजुद्दीन बाबा दर्गा (पागलखाना), झिंगाबाई टाकळी आणि मानकापूर या मार्गाने कोराडी येथील श्री महालक्ष्मी मंदिरात पोहोचणार आहे. या मार्गावरून दिंडी पुढे जात असताना विविध ठिकाणचे भाविक सहभागी होऊ शकतील.



महाप्रसादाचे आयोजन

दिंडीच्या समारोपा नंतर कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी २ वाजल्या पासून भाविकांना महाप्रसादाचा लाभ घेता येणार आहे. धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाच्या माध्यमातून भक्ती, सेवा आणि सामाजिक एकतेचा संदेश दिला जाणार आहे. श्री संत गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि श्री महालक्ष्मी जगदंबा मातेचे आशीर्वाद घेण्यासाठी भाविकांनी या पायदळ दिंडी यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, निर्मल नगरी च्यावतीने करण्यात आले आहे.

थोडक्यात

दहेगाव येथे दूध उत्पादकांना बकेटचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

धानला - चिरव्हा जि प क्षेत्र अंतर्गत येत असलेल्या दहेगाव येथील कुंजन दूध डेअरीचे संचालक संजय आकरे यांनी दरवर्षीप्रमाणे वंदाही सामाजिक बांधिलकी जपत दिवाळीनिमित्त त्यांचे ग्राहक असलेल्या सर्व दुध उत्पादकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन बकेटचे वाटप केले. दूध उत्पादनांमध्ये बहुतांश शेतकरी वर्ग असून, वंदा दुष्काळामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बेताचीच आहे. अशा परिस्थितीत दूध डेअरीचे संचालक आकरे यांनी बकेटचे वाटप केल्याबद्दल दूध उत्पादकांनी त्यांचे खूप खूप आभार मानले.

गट ग्रामपंचायत खंडाळा (घटाटे) येथे आनंदाचा शिधा, दिवाळीचा गोडवा गरजूंच्या घरी!



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

शिवसेना परिवाराच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या संकल्पनेतून आनंदाचा शिधा... दिवाळीच्या गोडवा गरजूंच्या घरी! हा उपक्रम संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. मौदा तालुक्याच्या सीमेवर स्थित पारशिवनी तालुक्यांतर्गत येणाऱ्या गट ग्रामपंचायत खंडाळा (घटाटे) अंतर्गत येणाऱ्या खंडाळा (घटाटे) व गहूहिवरा या गावात माजी सरपंच व सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल बोरकुटे यांच्या नेतृत्वात हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून दुष्काळाचे सावट असलेल्या कष्टकरी, अपंग, विधवा आणि गरजू बांधवांची दिवाळी गोड करण्याच्या हा प्रयत्न आहे. सणाच्या आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर खुलावा आणि प्रत्येकाच्या घरात आनंदाचा दीप उजळावा, बळीराजाची दिवाळी गोड व्हावी हाच या उपक्रमामागील प्रामाणिक हेतू व हीच मनापासून इच्छा असल्याचे सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल बोरकुटे यांनी सांगितले.

आजनगाव येथे आज सायंकाळी भाजयूमोतर्फे आयोजित लावणी कार्यक्रमाने दोन दिवसीय मंडईचा थाटात होणार समारोप



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

आजनगांव (ईसापूर) येथे आज मंगळवार (ता.१०नोव्हेंबर) पासून दोन दिवसीय मंडई उत्सवाला सुरुवात झालेली आहे. उद्या बुधवार (ता.११ नोव्हेंबर)ला सायं. भारतीय जनता युवा मोर्चा शाखा आजनगांव तर्फे प्रसिद्ध लावणी सम्राज्ञी कोमल नागपूरकर यांच्या लावणीच्या कार्यक्रमाने दोन दिवसीय मंडई उत्सवाचा थाटात समारोप होणार आहे. या समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी,माजी आमदार टेकचंद सावरकर, तालुका समन्वय समिती अध्यक्ष तथा भाजपा जिल्हाउपाध्यक्ष नरेश मोटघरे, सरपंच चिंतामण सारवे सह गावातील, परिसरातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमाच्या लाभ घेण्याचे आव्हान शाखा आजनगांव येथील भारतीय जनता युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

नैसर्गिक पाण्याच्या अंदाजावर मौदा तालुक्यात धानाच्या ओल्या बांध्यात युद्धस्तरावर गहू फेकायला सुरुवात

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

यंदा अत्यल्प पाऊस पडल्याने, पाणी साठवून ठेवणारे पेच व इतर धरणात पुरेसा पाणीसाठा नसल्याने, शेतकऱ्यांना गहू पिकाला पाणी मिळणार नसल्याचे पत्र संबंधित यंत्रणेकडून शेतकऱ्यांना कळविण्यात आले आहे व तसे पत्र सोशल मीडियाच्या विविध ग्रुप वर वायरलही करण्यात आले होते. मागील दोन-तीन वर्षांपासून पेरीव गव्हाची पद्धत कमी कमी होत असून, धान कापणीच्या दहा दिवसापूर्वी धान्याच्या ओल्या बांध्यातच गहू फेकण्याची पद्धत मौदा तालुक्यात सुरू झालेली आहे. त्यामुळे गहू अंकुरण्यासाठी पाण्याची गरज भासत नाही. त्यामुळे नरसाळा,हिवरा परिसरासह तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी त्यांच्या धान पिकाच्या शेतात गहू पीक घेण्यासाठी गहू युद्ध स्तरावर फेकायला सुरुवात केलेली आहे, असे नरसाळा येथील शेतकरी दिनेश भोले यांनी त्यांच्या हिवरा परिसरात साडेसात एकर धान्याच्या बांधात आज मंगळवार (ता.१० नोव्हेंबर)ला मजुरांच्या हाताने गहू फेकताना सांगितले. या परिसरातील जवळपास सर्व शेतकऱ्यांनी गहू फेकू केल्याचे मजुरांनी आवर्जून सांगितले.एक ते दीड महिन्यानंतर नैसर्गिक पाण्याच्या सरी कोसळल्यास, गहू पीक होण्याची शक्यता भोले यांनी वर्तवली आहे.



थोडक्यात

काटोल पारधी बेड्यावर जाऊन दिवाळी साजरी

निलेश हेलोडे यांचा १४ वर्षांपासूनचा साडी व साहित्याचे वितरण, स्तुत्य उपक्रमाचे अनेक स्तरावरून स्वागत



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर /काटोल

पारधी बेड्यावर गेल्या १४ वर्षांपासून जाऊन सामाजिक बांधिलकी जपत कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोडे (पाटील) राज्यमंत्री दर्जा यांचे पुढाकाराने काटोल येथे स्तुत्य उपक्रम सोमवार ९ नोव्हेंबरला पार पडला. आयोजकांनी पारधी समाजाला साड्या व इतर भेटवस्तु देऊन आनंददायी दिवाळी साजरी केली. यावेळी त्याच्यासोबत समाजसेवक सुभाष नोरोलीया, शेतकरी समितीचे अध्यक्ष बाबाराव वाघमारे, संजय गांधी यो. अध्यक्ष हेमंत कावडकर, जयंत कळंबे,सचिन उमप,युगांश हेलोडे,पारधी समाजाचे सुरमा राजपूत, रामचरण बेहनिया,सुरेश जोहानिया,नायडू पवार आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

दिवाळी केवळ दिव्याचा सण नसून प्रेम, प्रकाश,आपुलकी, सामाजिक बांधिलकी जपण्याचा आनंददायी उत्सव आहे. याच भावनेतून पारधी समाजातील समाज बांधवासोबत दिवाळी साजरी करण्याची प्रथा अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यकर्ते निलेश हेलोडे जपत आहे. सर्व स्तरातून उपक्रमाचे स्वागत करीत आहे. समाजाला मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर राहिलेल्या पारधी समाजाच्या चेहऱ्यावर हसू आणण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. स्नेह दीपावली कार्यक्रमाला महिला बालके, युवा मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित राहून आनंद साजरा केला..

साहोली येथे आढळलेल्या दुर्मिळ मांडूळ (मालन) सापाला जीवनदान!

वनविभागाच्या देखरेखीखाली नैसर्गिक अधिवासात सुरक्षित सुटका; सर्पमित्रांच्या तत्परतेचे कौतुक

दै.सिंहवाणी वृत्त, साहोली, ता. पारशिवनी

पारशिवनी तालुक्यातील साहोली गावात धर्मा मेश्राम यांच्या घरी दुर्मिळ समजल्या जाणाऱ्या मांडूळ (मालन) सापाचे दर्शन झाले.



साप घरात आढळल्याने घरमालकांनी खापरखेडा सर्पमित्रांशी संपर्क साधला. माहिती मिळताच सर्पमित्र मयूर कनोजे, धीरज जगणे आणि सुजल सरोदे यांनी घटनास्थळी धाव घेत सापाला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. त्यानंतर वनपरीक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वनरक्षक प्रकाश कालेकर, अक्षय जाधव आणि एस. एल. पिल्लेवाण यांच्या उपस्थितीत वनविभागाच्या देखरेखीखाली मांडूळ सापाला त्याच्या योग्य नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले. या मोहिमेमुळे एका वन्यजीवाला जीवनदान मिळाले असून मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी सर्पमित्र व वनविभागाचे सहकार्य महत्त्वाचे ठरत असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले.

नागरिकांना आवाहन

मांडूळ सापाबाबत अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. त्याच्या शेपटीला दोन तोंडे असल्याचा समज चुकीचा आहे. कोणत्याही सापाला मारू नये, स्वतः पकडण्याचा प्रयत्न करू नये किंवा त्याची विक्री करू नये. साप आढळल्यास वनविभाग किंवा अधिकृत सर्पमित्रांशी संपर्क साधावा. या संपूर्ण मोहिमेत सर्पमित्र आणि वनविभागाने दाखवलेली तत्परता वन्यजीव संवर्धनासाठी कौतुकास्पद आहे.

दिवाळी पर्वावर राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सहपरिवार घेतले प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन

रामटेक गडमंदिरात पहाटेच्या काकड आरतीला भक्तिभावाने उपस्थिती, शेतकरी बांधवांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

प्रभू श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रामटेक नगरीतील ऐतिहासिक गडमंदिर येथे दिवाळीच्या मंगल पर्वानिमित्त आज, दिनांक ८ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे आयोजित काकड आरतीला राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सहपरिवार उपस्थित राहून प्रभू श्रीरामचंद्रांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. शेकडो रामभक्तांनी पहाटेच्या काकड आरतीस मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने उपस्थिती लावली. आरतीच्या मंगलमय स्वरांनी संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला.

याप्रसंगी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरणी सर्वांच्या सुख, शांती व कल्याणासाठी प्रार्थना केली. विशेषतः दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी बांधवांच्या जीवनात सुखाचे, समाधानाचे आणि समृद्धीचे दिवस यावेत, शेतकऱ्यांना चांगले पीक व भरभराट लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी केली. दिवाळीच्या पवित्र पर्वावर प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन घेऊन समाजाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्याचा हा भक्तिमय क्षण उपस्थित रामभक्तांसाठीही विशेष ठरला.

शिववैभव किल्ले स्पर्धा- २०२६ ला उत्स्फूर्त प्रतिसाद

१२५ हून अधिक गड-किल्ल्यांचा सहभाग, नितीन गडकरी यांच्या हस्ते परीक्षण परिक्रमेला १२ नोव्हेंबरला होणार प्रारंभ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास, शौर्य आणि स्थापत्यवैभव नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित 'शिववैभव किल्ले स्पर्धा २०२६'ला यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. या स्पर्धेत १२५ हून अधिक गड-किल्ल्यांचा सहभाग आहे.



गुरुवार, १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून किल्ल्यांच्या परीक्षण परिक्रमेला प्रारंभ होणार आहे. या परिक्रमेदरम्यान परीक्षक विविध ठिकाणी साकारलेल्या किल्ल्यांची पाहणी करणार आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून कला, साहित्य, संस्कृती आणि परंपरांचा प्रचार व प्रसार व्हावा, या उद्देशाने दरवर्षी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्यावतीने 'शिववैभव किल्ले स्पर्धा' आयोजित केली जाते. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. शहरातील किल्लेप्रेमींनी स्पर्धेतील किल्ल्यांना भेट देऊन या उपक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे करण्यात आले आहे.

मध्यवर्ती कारागृहात शिवप्रताप दिन साजरा

दरम्यान, १० नोव्हेंबर हा शिवप्रताप दिन असल्याने या दिवसाचे औचित्य साधून नागपूर मध्यवर्ती कारागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे सचिव जयप्रकाश गुप्ता यांनी कारागृहात बंदिवानांनी साकारलेल्या किल्ल्याचे पूजन करून शिवप्रताप दिन साजरा केला. नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदिवानांनी जलदुर्ग प्रकारातील ऐतिहासिक सिंधुदुर्ग किल्ल्याची अतिशय सुंदर, आकर्षक आणि भव्य प्रतिकृती कारागृह अधीक्षक श्री. वैभव सु. आगे आणि सौ. दीपा वै. आगे यांच्या मार्गदर्शनात साकारली आहे.

रामटेक व्यापारी संघटनेच्या दीपावली स्नेहमिलन सोहळ्याला राज्यमंत्री जयस्वाल यांची उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक : दीपावलीच्या मंगलमय पर्वानिमित्त रामटेक व्यापारी संघटनेच्या वतीने सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२६ रोजी पानसुपारी, स्नेहमिलन आणि सामूहिक लक्ष्मीपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी उपस्थित राहून व्यापारी बांधवांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सामूहिक लक्ष्मीपूजन करून सर्वांच्या सुख, समृद्धी व भरभराटीसाठी प्रार्थना करण्यात आली. दीपावलीच्या निमित्ताने आयोजित या स्नेहमिलन सोहळ्यात व्यापारी बांधवांनी एकत्र येत परस्परांना शुभेच्छा दिल्या. या उपक्रमातून व्यापारी वर्गातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.



याप्रसंगी रामटेक नगर परिषद अध्यक्ष बिकेंद्र महाजन, शिवसेना रामटेक शहर प्रमुख राजेश किंमतकर, आरोग्य सभापती सुमित कोठारी, बांधकाम सभापती विश्वास पाटील, नगरसेवक रोशन चाफले,महेश बिसन, राधेश्याम साखरे, दिनेश माकडे, राजेश नानोटे, राहुल शर्मा, हर्ष कनोजे यांच्यासह रामटेक बाजारपेठेतील लहान-मोठ्या सर्वच क्षेत्रांतील व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या दीपावली स्नेहमिलन सोहळ्यामुळे व्यापारी बांधवांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

लक्ष्मीपूजनाच्या पहाटे रामटेक गडमंदिरात १५ हजार भाविकांची मांदियाळी!

काकड आरतीसाठी मध्यरात्रीपासूनच भाविकांची उपस्थिती; ढोल-ताशांच्या गजराने गड परिसर दुमदुमला



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

लक्ष्मीपूजनाच्या पावन पर्वावर ८ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता रामटेक येथील श्रीराम गडमंदिरात पार पडलेल्या काकड आरतीला सुमारे १५ हजार भाविकांनी उपस्थिती लावली. नागपूर शहरासह विदर्भातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते. महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण धार्मिक परंपरापैकी एक असलेल्या या काकड आरतीचे विशेष आकर्षण भाविकांमध्ये दिसून आले. पहाटे ५ वाजताच्या काकड आरतीसाठी अनेक भाविक मध्यरात्री ३ वाजल्यापासूनच उठून गडमंदिराकडे रवाना झाले होते. वृद्धापासून लहान मुलांपर्यंत सर्वांमध्ये काकड आरतीबद्दल मोठी श्रद्धा आणि उत्सुकता दिसून आली. कोजागिरी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू झालेल्या या काकड आरतीची सांगता कार्तिक पौर्णिमेला होणार आहे.

रामटेकच्या श्रीराम मंदिराला सुमारे एकवीसे वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. चौथ्या शतकात वाकाटक काळातील राणी रामपादुकांचे पूजन करीत असल्याचे पुरातत्त्व विभागाच्या पुराव्यांवरून स्पष्ट होते. त्यामुळे या मंदिराला धार्मिकेतेसोबतच ऐतिहासिक महत्त्वही प्राप्त झाले आहे. यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते. काकड आरतीमध्ये रामभंदिर व लक्ष्मण मंदिराचे पुजारी सहभागी झाले होते. आरतीनंतर रामराज्य ढोल-ताशा पथकाचे संयोजक मोनू रघुवंशी यांच्या नेतृत्वात ७० कलाकारांनी ढोल-ताशांच्या गजरात रंगतदार सादरीकरण केले. या सादरीकरणामुळे संपूर्ण गड परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

काकड आरतीसाठी आलेल्या भाविकांसाठी सीतामाई रसोई सेवा संस्थेच्या वतीने नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती. विशेष म्हणजे कोजागिरी पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत दररोज येणाऱ्या भाविकांसाठी दानदात्यांच्या सहकार्याने नाश्त्याची सेवा पुरविण्यात येत आहे. भाविकांची प्रचंड गर्दी लक्षात घेता गडमंदिर परिसरातील वाहनतळावर मोठी गर्दी झाली होती. मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर जवळपास एक किलोमीटरपर्यंत दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पहाटेच्या थंड वातावरणातही भाविकांचा उत्साह आणि श्रद्धा ओसंडून वाहत होती.

वडिलांच्या स्मृती जपताना राजेश क्षीरसागर यांचा सामाजिक उपक्रम; गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य!

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि वडिलांच्या स्मृती जपण्याचा स्तुत्य उपक्रम राबवत नरखेड नगर परिषदेचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी गरजू विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप केले. नरखेड येथील प्रतिष्ठित शेतकरी स्व. अशोकराव पुंजारामजी क्षीरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे धाकटे अभियंता पुत्र राजेश क्षीरसागर यांच्या वतीने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली असून परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काटोल-नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर होते. यावेळी नरखेड नगर परिषदेचे नगराध्यक्ष मनोज कोरडे, समन्वय समितीचे अध्यक्ष शामराव बारई, बांधकाम सभापती संजय कामडे, शिक्षण सभापती राजेंद्र बालपांडे, पाणीपुरवठा सभापती अजय सोमकुवर, मारोतराव बोरकर, देवेंद्र क्षीरसागर, सुदर्शन नवघरे, प्रशांत खुरसंगे, नितीन ढोमणे, संजय गुरमुळे, छाया खुरसंगे, सीमा सरोदे, सतीश टेकाडे, शैलेश बागडे, उमेश कळंबे, शांताराम बांडे, सुनील कडमधाड आदी मान्यवर उपस्थित होते.

शिक्षण हेच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याचे खरे साधन असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, या भावनेतून अशा प्रकारचे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात. वडिलांच्या स्मरणार्थ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करून राजेश क्षीरसागर यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्यासोबतच समाजातील इतर घटकांनाही मदतीची प्रेरणा मिळते.

स्कूल बॅग मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. हातात मिळालेल्या नव्या बॅगा उंचावून विद्यार्थ्यांनी आपला आनंद व्यक्त केला. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उत्साहाने कार्यक्रमस्थळी आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या या निरागस आनंदाने उपस्थित मान्यवरही भारावून गेले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गोपाळ क्षीरसागर, गौरव वैद्य, लोकेश कोल्हे, पंकज वैद्य, दिलीप वघाळे, करण कडमधाड, यश क्षीरसागर, संकेत कुऱ्हाडे, शुभम सुहागपुरे व इतर सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

अनिल देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश, नरखेडमधील ५०० शेतकऱ्यांचा हक्काचा रस्ता अखेर मोकळा

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड शहरातील रेल्वे गेटपासून मोंग्याच्या पुलापर्यंत तसेच महाराष्ट्र राज्याच्या सीमेकडे जाणाऱ्या रेल्वेमार्गाच्या डाव्या बाजूने असलेला शेतकऱ्यांचा रस्ता रेल्वे प्रशासनाने स्टील प्लेटचे कुंपण उभारून बंद केला होता. त्यामुळे मौजा नरखेड, गोंडेगाव, नवेगाव व दळवी मोहदी परिसरातील सुमारे ५०० शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या प्रश्नावर माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर आज, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी रेल्वे प्रशासनाच्या वतीने बंद करण्यात आलेला रस्ता मोकळा करण्यात आला. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, अनिल देशमुख यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.



नरखेड भागाच्या दौऱ्यावर असताना बाधित शेतकऱ्यांनी अनिल देशमुख यांची भेट घेऊन रस्ता बंद झाल्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांबाबत निवेदन दिले होते. शेतकऱ्यांच्या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत देशमुख यांनी स्वतः घटनास्थळी जाऊन पाहणी केली होती. रस्ता बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे, शेतीची मशागत करणे, पेरणी, खते व बियाण्यांची वाहतूक तसेच शेतीमालाची ने-आण करणे कठीण झाले होते. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

या समस्येच्या सोडवणुकीसाठी अनिल देशमुख यांनी नागपूरचे जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन रेल्वे प्रशासनासह संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची विशेष बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. त्यानुसार दि. २ नोव्हेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी रेल्वे, महसूल व भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना बाधित शेतकऱ्यांना सोबत घेऊन प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली.

त्यानंतर दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अनिल देशमुख यांच्या उपस्थितीत नरखेड तहसील कार्यालयात पुन्हा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला तहसीलदार, रेल्वे प्रशासनाचे अधिकारी, भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी आणि बाधित शेतकरी उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांचा बंद करण्यात आलेला रस्ता मोकळा करून देणे तसेच त्यांच्या शेतात जाण्या-येण्यासाठी कायमस्वरूपी व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली होती.

बैठकीत अनिल देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी मांडताना, शेतकऱ्यांचा पारंपरिक व हक्काचा रस्ता बंद झाल्यामुळे त्यांची दैनंदिन शेतीकामे प्रभावित झाली आहेत. शेतीच्या हंगामात रस्त्याअभावी शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागणे अन्यायकारक आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे केवळ तांत्रिक बाब म्हणून न पाहता शेतकऱ्यांच्या उपजीविकेशी संबंधित गंभीर प्रश्न म्हणून पाहावे आणि रस्ता तातडीने मोकळा करावा, अशी ठाम भूमिका मांडली होती.

अखेर अनिल देशमुख यांनी प्रशासनाकडे केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा, जिल्हाधिकारी कार्यालयात झालेली बैठक, अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी आणि नरखेड तहसील कार्यालयातील बैठकीनंतर आज रेल्वे प्रशासनाने बंद केलेला रस्ता मोकळा केला. त्यामुळे नरखेड, गोंडेगाव, नवेगाव व दळवी मोहदी परिसरातील सुमारे ५०० शेतकऱ्यांचा अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काच्या प्रश्नासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, रस्ता मोकळा झाल्यामुळे शेतीच्या कामांसाठी ये-जा करणे आता सुलभ होणार आहे.